**स्थायी समिती**

**दाखल विषय – दि. २१/६/२०१७**

**विषय क्रमांक :– १९८ त्वर्य**

आरोग्य खात्याकडील कमला नेहरू रूग्णालय व डॉ.नायडू रूग्णालय यांना अनुक्रमे अंदाजे लागणारे ४३८०० लिटर्स व ९१२५ लिटर्स दूध दि.१/४/२०१७ ते ३१/३/२०१८ या मुदतीसाठी शासकीय दूध योजना, पुणे यांचेकडून शासनाकडे उपलब्ध असलेल्या साठ्यानुसार प्रतिलिटर ठिकाण पोहोच दर गाईचे दूध रू.३६=७५ या दराने होणारी र.रू.१९,४४,९९४/– (अक्षरी–रू.एकोणिस लाख चव्वेचाळीस हजार नऊशे चौऱ्याहत्तर फक्त) पर्यंत अगर रूग्णालयातील रूग्णांच्या संख्येत प्रासंगिक वाढ होत असते. शासन वेळोवेळी दर बदलत असते त्याप्रमाणे जादा दूध लागल्यास शासकीय दूध योजनेकडे उपलब्ध असलेल्या साठयानुसार वेळोवेळी कमी/जास्त प्रतिलिटर ठिकाण पोहोच दर त्याप्रमाणे होणाऱ्या रकमेपर्यत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम शेड्यूल चॅप्टर ५(२)(२) नुसार दूध पुरविण्यासाठी शासकीय दूध योजना, पुणे यांचेकडून करारनामा न करता दूध खरेदी करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र.मआ/आरोग्य/१०० दि. १७/६/२०१७ चे पत्र.

(टिप – सदर खरेदी र.रू.३०००/– पेक्षा जास्त होत असल्याने मनपा अधिनियमानुसार टेंडर्स मागविणे जरूरीचे आहे. तथापी ही खरेदी राज्य शासनाच्या अधिकृत अशा शासकीय दूध योजनेकडून होत असल्याने व यापेक्षा कमी दर येण्याची शक्यता नसल्याने ही खरेदी शासकिय दूध योजना, पुणे ( गर्व्हनमेंट मिल्क सप्लाय स्किम ) यांचेकडून टेंडर न काढता खरेदी करणेत येत आहे.)

**विषय क्रमांक :– १९९ त्वर्य**

पुणे मनपा नवीन विस्तारीत इमारत येथे पदाधिकारी कार्यालय व नगरसचिव विभाग येथे मॉडयुलर पध्दतीचे फर्नीचर करणे (बी–२ पध्दतीने) कामी टेंडर मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.कन्सेप्ट क्रिएटर यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे असल्याने त्यांचेकडून र.रु.१,३४,०७,१३६=६७ पर्यत काम करुन घेणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र.मआ/भवन/१०१ दि.१७/६/२०१७ चे पत्र.

**विषय क्रमांक :– २०० त्वर्य**

अभियांत्रिकी महाविद्यालय येथे फ्लाय ओव्हर वरुन उतरण्याकरीता आर.सी.जीना करणे कामी टेंडर मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.ए.एस.वाणी ॲन्ड असोसिएट्स यांचे टेंडर दोघात कमी रकमेचे (टेंडर र.रु. ३५,०९,६४७=३५ पेक्षा १०.२१% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३१,५१,३१२=३५ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार वाढ अदा करणेस/कपात करणेस व त्याकरीता त्यांच्याशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मुअ(प्र)/१०३ दि.१७/६/२०१७ चे पत्र.

**विषय क्रमांक :– २०१ त्वर्य**

पुणे महानगरपालिका हद्दीतील मोकाट डुक्करांच्या वराह नियंत्रणाचे काम १२ महिने कालावधीसाठी खाजगी संस्थेस देणे (बी–२ पध्दत) कामी टेंडर मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.मयुर पिगरी फार्म यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे असल्याने पुणे महानगरपालिका हद्दीतील मोकाट डुक्करांच्या नियंत्रणाचे काम खाजगी संस्थेस देण्यासाठी मोठे वराहसाठी रु. १५०/– प्रति नग व लहान वराहासाठी रु.१००/– प्रति नग असा लिलावासाठीचा दर मान्य करणेस तसेच लिलावातील रक्कमेतून ९०% रक्कम पालिका फंडात वेळोवेळी जमा करण्यास व लिलावातील रक्कमेतून १०% रक्कम ठेकेदारास प्रोत्साहनपर देण्यास व मे.मयुर पिगरी फार्म यांच्याशी त्यांचे टेंडर दरानुसार मोठे वराहासाठी र.रु. ९१३/– प्रति नग (१० किलो वरील) व लहान वराहासाठी र.रु.५००/– प्रति नग (१० किलो आतील) याप्रमाणे दर देण्यास व त्यांच्याकडून र.रुपये४८,००,०००/– (र.रुपये अठ्ठेचाळीस लाख फक्त) पर्यंत काम करून घेणेस, त्याकरीता करारनामा करण्यास, बिले अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१०७ दि.१९/६/२०१७ चे पत्र.

**विषय क्रमांक :– २०२ त्वर्य**

पुणे महानगरपालिकेचे विविध जलकेंद्रासाठी द्रवरुप तुरटी ग्रेड V (IS 299:2012 नुसार) पुरविणे या कामाबाबत मान्य टेंडर परिमाणापेक्षा ५०% वाढीव परिमाण घेणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा. क्र. मआ/पापु/१०९ दि.२०/६/२०१७ चे पत्र.

१) टेंडर क्र. ७१२/२०१५ चे पुरवठादार मे.स्वानंद ट्रेडर्स यांचेकडून पुणे महानगरपालिकेचे विविध जलकेंद्रासाठी द्रवरुप तुरटी ग्रेड V (IS 299:2012 नुसार) पुरविणे या कामी टेंडरचे ५०% वाढीव परिमाण म्हणजे २२०० मे.टन र.रुपये १,८०,६२,०००/– (अक्षरी रु.एक कोटी ऐंशी लाख बासष्ठ हजार फक्त) अधिक पुर्वीची मान्य र.रुपये ३,६१,२४,०००/– (अक्षरी रु.तीन कोटी एकसष्ठ लाख चोवीस हजार फक्त) असे एकूण र.रुपये५,४१,८६,०००/– (अक्षरी रु.पाच कोटी एक्केचाळीस लाख श्याऐंशी हजार फक्त) पर्यंत खरेदी करणेस

२) वरील क्र. १ मध्ये नमुद केल्याप्रमाणे ५०% वाढीव परिमाणाच्या (२२०० मे.टन) खरेदीसाठी पुरवठादार मे.स्वानंद ट्रेडर्स यांच्याशी करारनामा करणेस

३) खरेदी केलेल्या परिमाणांचे बिल पुरवठादारास अदा करणेस.

**विषय क्रमांक :– २०३ त्वर्य**

पुणे महानगरपालिकेच्या विविध जलकेंद्रे व मैलापाणी शुध्दीकरण केंद्रे यासाठी ९०० कि.ग्रॅ. कंटनर्समध्ये द्रवरुप क्लोरीन वायू (IS646:1986 नुसार) मेक– SRAAC/GACL/ ग्रासिम/NRC/HOC/MFL पुरविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी पुढील ३ टेंडरदारांकडून मे.रंगरसायन, मे.जी.एस.कमर्शियल कॉर्पोरेशन व मे.आयडीयल केमिकल्स (इं) प्रा.लि. यांचेकडून विभागून (६०:२०:२० नुसार) खरेदी करणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा. क्र. मआ/पापु/११० दि.२०/६/२०१७ चे पत्र.

१) र.रुपये ८,८००/– प्रति मे.टन सर्व करांसह या दराने अनुक्रमे ६०:२०:२० नुसार १०२० मे.टन र.रुपये८९,७६,०००/– मे.रंगरसायन व ३४० मे.टन र.रुपये २९,९२,०००/– मे.जी.एस.कमर्शियल कॉर्पोरेशन, मुंबई व ३४० मे.टन र.रुपये २९,९२,०००/– मे.आयडीयल केमिकल्स (इं) प्रा.लि., ठाणे याप्रमाणे एकूण १७०० मे.टन क्लोरीन वायूसाठी एकूण र.रुपये १,४९,६०,०००/– (र.रुपये एक कोटी एकोणपन्नास लाख साठ हजार फक्त) पर्यंत खरेदी करणेस

२) क्र. १ मध्ये नमूद केल्याप्रमाणे खरेदीसाठी करारनामा करणेस व अनामत रक्कम भरुन घेणेस

३) वरीलप्रमाणे खरेदी केलेल्या परिमाणाचे बिल पुरवठादारास आदा करणेस

**विषय क्रमांक :– २०४ त्वर्य**

मा.अविनाश बागवे, मा.बाळासाहेब ओसवाल, मा.दिलिप बराटे व मा.प्रमोद उर्फ नाना भानगिरे यांचे दि.१६/६/२०१७ चे पत्र.

पुणे शहरात मनपाच्या क्षेत्रिय कार्यालयाकडून पावसाळी पूर्व कामे निविदा पध्दतीने मागविण्यात आलेली होती. यामध्ये बहुतांश कामे नाला साफसफाई करणेबाबतची होती. मात्र नाला साफसफाईच्या कामाच्या पूर्वगणकपत्रके वारेमाप फुगवून तयार केलेली असल्याच्या तक्रारी अनेक ठेकेदार ,स्वयंसेवी संस्था ,प्रसार माध्यमे, नागरिक यांनी मोठ्याप्रमाणावर केलेल्या आहेत. प्रशासनाने मागविलेल्या टेंडरला आलेला टेंडर दर पाहता नागरिकांच्या तक्रारीमध्ये सकृतदर्शनी तत्थ असल्याचे निदर्शनास येत आहे. नाला साफसफाई टेंडर तब्बल ५० ते ६०% कमी दराने ठेकेदारांनी भरलेली आहेत. यामध्ये आयकर व अन्य अनिवार्य शासकीय वजावटी, अनामत रक्कम अशी १२ ते १५% टेंडर बीलातून होणाऱ्या वजावटी या टेंडर कामात जमा केल्यास तब्बल ६५ ते ७०% कमी दराने प्रत्यक्षात ठेकेदारास काम करावे लागणार आहे. म्हणजेच अवघ्या ३० ते ३५% टेंडर रक्कमेत ठेकेदार १००% टेंडर रक्कमेचे काम करणार असल्याचे धक्कादायक व अभूतपूर्व प्रकार या टेंडर बाबत आढळून येत आहे. या रक्कमेत काम होणे अशक्य असूनही ठेकेदार बॅक गॅरंटी देवून नाला साफसफाईचे टेंडर कामे स्पर्धेतून घेत आहेत. याचा अन्वयार्थ प्रशासनाने केलेली पूर्वगणकपत्रके ही पूर्णत: बोगस असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहेत.यामुळे अकारण पुणे मनपाची प्रतिमा मलीन होत आहे.

मनपा मार्फत नाला साफसफाईची झालेली टेंडर प्रक्रीया पूर्णत: सदोष असून मा.अतिरिक्त आयुक्त स्तरावर या नाला साफसफाई टेंडर प्रक्रीयेची समिती नेमून चौकशी करण्यास, या समितीचा सविस्तर अहवाल आल्याशिवाय या कामांची बिले अदा न करण्यास तसेच सदोष पूर्वगणनपत्रके बनविल्याचे आढळल्यास संबंधितावर शासकिय नियमानुसार योग्य ती कारवाई करण्यास मान्यता देण्यात यावी.

**विषय क्रमांक :– २०५ त्वर्य**

मा.आबा बागुल यांचे दि. १७/६/२०१७ चे पत्र.

धनकवडी स.नं. १३ मधील चव्हाणनगर, संभाजीनगर याठिकाणी जनता वसाहत येथील नागरिकांचे मनपा ठराव क्र. ५२८ दि. २०/१/२००४ अन्वये पुर्नवसन करण्यात आले होते. सदर ठिकाणी ते अनेक वर्षापासून राहत असून त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. सदर नागरिकांना ही घरे मालकी हक्काने दिल्यास त्यांना घरबांधणी, गृहकर्ज अशा बाबी करता येतील.

तरी धनकवडी स.नं. १३ मधील चव्हाणनगर, संभाजीनगर याठिकाणी पुर्नवसन योजनेत राहत असलेल्या नागरिकांना त्यांचे पुर्नवसन म्हणून दिलेली घरे त्यांना मालकी हक्काने देण्यात यावीत.

**विषय क्रमांक :– २०६ त्वर्य**

मा.डॉ.सिध्दार्थ धेंडे, उपमहापौर व मा.सुनिल कांबळे यांचे दि. १७/६/२०१७ चे पत्र.

पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. कडील सर्व कर्मचाऱ्यांसाठी अंशदायी वैदयकिय सहाय्य योजना पुणे मनपा आरोग्य विभागामार्फत राबविणेसाठी खालील बाबीस मान्यता द्यावी.

१. पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमीटेड यांनी आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये त्रैमासिक रक्कम रू.१,५०,००,०००/-(अक्षरी:-रक्कम रू. एक कोटी पन्नास लाख रूपये फक्त) प्रमाणे एकुण रक्कम रू.६,००,००,०००/-(अक्षरी:-रक्कम रू. सहा कोटी रूपये फक्त) महामंडळाकडील अंशदायी वैदयकिय सहाय्य योजनेचे सभासदत्व घेतलेल्या सर्व कर्मचाऱ्यांसाठी पुणे मनपा आरोग्य खात्यामार्फत सी.जी.एच.एस. नियमावली नुसार राबविल्या जाणाऱ्या अंशदायी वैदयकिय सहाय्य योजनेसाठी होणाऱ्या खर्चापोटी पुणे महानगरपालिकेकडे जमा करणे व सदर रक्कम संबंधित योजनेसाठी खर्च करणे.
२. पुणे महानगरपालिका आणि पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमीटेड यांचेमध्ये महामंडळाकडील अंशदायी वैदयकिय सहाय्य योजनेचे सभासदत्व घेतलेल्या सर्व कर्मचाऱ्यांसाठी अंशदायी वैदयकिय सहाय्य योजनेअंतर्गत वैदयकिय सुविधा पुरविणेबाबत पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमीटेड यांचे सोबत करारनामा करणेस.
३. पुणे महानगर परिवहन महामंडळाकडील निवृत्त सेवकांपैकी ज्या सेवकांना पेन्शन लागू आहे, अशा सेवकांना मनपा, पुणेच्या धर्तीवर निवृत्त सेवकांना वैद्यकीय सहाय्य योजना लागू करण्यात यावी तसेच जे सेवक निवृत्त झालेले आहेत किंवा होणार आहेत अशा निवृत्त/स्वेच्छा निवृत्ती सेवकांना वैद्यकीय सहाय्य योजना लागू करण्यास या सेवकांची वर्गणी निश्चित करताना कल्पीत पेन्शन वेतन निश्चित करण्यास व त्या वेतन वैद्यकीय सहाय्य योजनेच्या नियमानुसार वर्गणी निश्चित करण्यास व त्याप्रमाणे खात्याचा हिस्सा देखील ठरलेल्या धोरणानुसार देण्यास, अशा निवृत्त /स्वेच्छा निवृत्ती सेवकांनी कल्पीत पेन्शन योजनेत निश्चित झालेली वैद्यकीय सहाय्य योजनेची वर्गणी आर्थिक वर्षाच्या सुरवातीस महामंडळाकडे जमा करण्यास व सदरची योजना ऐच्छिक स्वरूपात राबविण्यास

**विषय क्रमांक :– २०७ त्वर्य**

मा.सौ.रेखा टिंगरे व मा.प्रिया गदादे यांचे दि. २१/६/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र. १ ला पाणी पुरवठा करणाऱ्या विद्यानगर पंपिंग स्टेशन, होळकर पंपिंग स्टेशन, चिखली पंपिंग स्टेशन, रावेत पंपिंग स्टेशन येथे जनरेटर सेट बसवण्यात यावेत जेणेकरुन लाईट गेल्यास पाणी पुरवठा करता येईल.

**विषय क्रमांक :– २०८ त्वर्य**

मा.अनिल उर्फ बॉबी टिंगरे व मा.योगेश समेळ यांचे दि. २१/६/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र. १ ड मधील विश्रांतवाडी ते धानोरी मुख्य २४ मीटर रस्ता रुंदीकरणात बाधित मिळकत धारकांना नुकसान भरपाईपोटी रुपये ४३,६७,४२,०६५/- इतकी रक्कम देणे अपेक्षित होते. यापैकी पुणे मनपाने नुकसान भरपाईपोटी रुपये १५ कोटी शासनाकडे दि. २९/३/२०११ अन्वये जमा केलेली आहे.

तरी उर्वरित रक्कम रुपये २८,६७,४२,०६५/- इतकी रक्कम सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकातुन उपलब्ध करुन देण्यात यावी.

**विषय क्रमांक :– २०९ त्वर्य**

मा.महापौर यांच्या दैनंदिन घडामोडी, धोरणात्मक निर्णय, नविन राबविले जाणारे महत्वपूर्ण उपक्रम यांची माहिती पुणेकर जनतेला सहजपणे वेळेत मिळावी म्हणून ‘सोशल मिडीया’द्वारे प्रसिद्धी आणि जनसंपर्क प्रस्थापित करणे या कामाची पुणे महानगरपालिकेच्या वतीने व्यवस्था व्हावी, अशी मागणी मा. महापौर, पुणे यांनी संदर्भांकित पत्र क्र.१ अन्वये केलेली आहे.

मा. महापौर यांच्या दैनंदिन घडामोडी, धोरणात्मक निर्णय, नविन राबविले जाणारे महत्वपूर्ण उपक्रम यांची माहिती पुणेकर जनतेला सहजपणे वेळेत मिळावी म्हणून 'सोशल मिडीया'द्वारे प्रसिद्धी आणि जनसंपर्क प्रस्थापित करणेकरिता त्या स्वरुपाचे काम करणा-या व्यक्ती/ संस्था यांचेकडून कोटेशन मागवून काम करून घेण्यासाठी दि. १/४/२०१७ ते दिनांक३१/३/२०१८ या कालावधीसाठी एजन्सीची नेमणूक करून काम करून घेण्यासाठी सोशल मिडिया या स्वरूपाचे काम करणाऱ्या व्यक्ती/ संस्था यांचेकडून कोटेशनची मागणी करणेकरिता संदर्भ क्र.४ अन्वये, टेंडर सेल विभागाकडे पत्र पाठवून कोटेशन मागविणेत आले. टेंडर सेल विभागामार्फत ऑनलाईन दिलेल्या जाहिरातीस अनुसरून तीन कोटेशन्स प्राप्त झालेले असून आलेल्या तीन कोटेशनपैकी अ.क्र. १ चे कोटेशनधारक M/S. XTREME CREATIONS, २०२/२०३ गुलमोहोर अपार्टमेंटस्,मधुबन सोसायटी, कर्वेनगर, पुणे ४११०५२ यांनी दिलेले दर हे इतर दोन दरपत्रकधारकांपैकी सर्वात कमी व वाजवी असल्याने मा. महापौर यांचे 'सोशल मिडीया'द्वारे प्रसिद्धी आणि जनसंपर्क प्रस्थापित करणेचे काम दि.१/४/२०१७ ते दि.३१/३/२०१८ या कालावधीसाठी **M/S. XTREME CREATIONS**, २०२/२०३ गुलमोहोर अपार्टमेंटस्,मधुबन सोसायटी, कर्वेनगर, पुणे ४११०५२ यांचेकडून त्यांनी दिलेल्या दरपत्रकानुसार 'सोशल मिडीया मॅनेजमेंट' कामाचे प्रित्यर्थ **रक्कम रु. २५,०००/- (Per month) (सर्व टॅक्सेस धरुन)**, संदर्भ क्र. ६ अन्वये मा.अति.महापालिका आयुक्त (ई.) यांची प्रशासकीय मान्यता मिळालेप्रमाणे प्रस्तावित सोशल मिडियाचे काम रक्कम रु.२,००,०००/-**(अक्षरी रक्कम रु. दोन लाख फक्त)** मर्यादेपर्यंत करुन घेणेस तसेच त्याप्रमाणे रक्कम अदा करणेस, त्यासाठी त्यांच्याकडून करारनामा करुन घेणेस व त्याप्रित्यर्थ येणारे सदर कामाचे बिल खालील अर्थशिर्षकावर खर्ची टाकून सदर कामाची वर्क ऑर्डर दिलेल्या दिनांकापासून प्रत्यक्ष कार्यवाही करणेस व संबंधितांस बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.नगरसचिव यांचे जा.क्र. २०३६ दि.२१/६/२०१७ चे पत्र.

सन २०१७ - २०१८ चे अंदाजपत्रक, १. मुख्य देखरेख वसुली वगैरे, क. महानगरपालिका व स्थायी समिती, १. नगरसचिव यांचे कार्यालय, ३. संकीर्ण (RE11A 103) मान्य तरतूद रक्कम रूपये १,००,००,०००/-

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**